Publication : Maharashtra Times
Date : 23/11/2016

# महाराष्ट्र टाइम्स

# विद्यापीठाची उपकेंद्रे होणार हायटेक

**म. टा. वृत्तसेवा, ठाणे**



अद्ययावत साधने, सुसज्ज ऑडिटोरिअम अशा हायटेक वर्गात शिकण्याची संधी मुंबई विद्यापीठाच्या ठाणे उपक्रेंदामधील विद्यार्थ्यांना मिळणार आहे. केंद्रामध्ये सुरू होणाऱ्या अत्याधुनिक ऑडिटोरिअमच्या माध्यमातून विद्यापीठांची केंद्र एकमेकांशी जोडण्यात येणार असून विद्यार्थ्यांना चित्रपट निर्मितीचेही सशक्त धडे गिरविता येणार आहेत.

दिरंगाईमुळे चर्चेत असणाऱ्या मुंबई विद्यापीठाच्या ठाणे उपकेंद्रामध्ये आता तंत्रज्ञानाची मदत घेतली आहे. केंद्रामध्ये असणारे सभागृह आता कात टाकणार असून त्याचे रूपांतर सुसज्ज अशा ऑडिओ व्हिज्युअल रूममध्ये होणार आहे. यापूर्वी कलिना विद्यापीठातील केंद्रामध्ये हा प्रयोग करण्यात आला असून उपकेंद्रामध्ये प्रयोग होणारे ठाणे हे पहिलेच केंद्र आहे. या ऑडिटोरिअमच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चित्रपट निर्मितीचे धडे गिरविता येणार आहेत. शॉर्टफिल्म, माहितीपट या क्षेत्राबाबत तरुणांचे वाढते आकर्षण लक्षात घेता सर्व अत्याधुनिक साहित्यासह त्यांना या क्षेत्राचा अनुभव घेता यावा, यासाठी हा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यासाठी युएफओ मुव्हिज या संस्थेची मदत घेण्यात आली असून त्यांचे मार्गदर्शनही विद्यार्थ्यांना मिळणार आहे. तसेच विद्यार्थ्यांनी साकारलेल्या शॉर्टफिल्म्स स्पर्धेत अथवा महोत्सवात प्रदर्शित करण्यातही संस्था विद्यार्थ्यांना सहकार्य करणार आहेत. या ऑडिटोरिअममधील तंत्रज्ञान प्रणालीमुळे विद्यापीठाची उपकेंद्रे जोडली जाणार असल्याने विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण घेता येणार आहे. ज्या केंद्रामध्ये ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे तेथील सर्व विद्यार्थी तसेच शिक्षकांना ऑनलाइन संपर्क साधता येणार आहे. त्यामुळे एका शहरात असणारे शिक्षक अथवा एखाद्या विषयातील तज्ज्ञ यांचे ऑनलाइन लेक्चर इतर उपकेंद्रामधील मुलांनाही ऐकता येणार आहे. अद्ययावत ऑडिटोरिअमचा वापर केवळ विद्यार्थ्यांसाठी न करता शहरातील गरजू विद्यार्थी, तसेच रसिक यांच्यासाठीही केला जाणार आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना या ऑडिटोरिअममध्ये चित्रपट, माहितीपट दाखविले जाणार आहेत.

**विद्यार्थ्यांना सर्व सुविधांनी युक्तअसे अद्ययावत शिक्षण मिळावे, यासाठी हा प्रयोग करण्यात येणार आहे. चित्रपट निर्मितीबाबत विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण मिळावे, तसेच त्यांना विविध प्रयोगांची संधी मिळावी यासाठी हा प्रयोग महत्वाचा ठरेल. तंत्रज्ञानाच्या माध्यमतून केंद्र जोडली गेली तर सर्व विद्यार्थ्यांना राज्यातील अनेक तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणे सोपे होईल.**

**- डॉ. प्रसाद कर्णिक,**
समन्वयक, ठाणे सबसेंटर

Online Link - http://maharashtratimes.indiatimes.com/maharashtra/thane-kokan-news/thane/universitys-subcentres-will-be-hitech/articleshow/55568951.cms